महत्वाचे

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, नाशिक विभागीय मंडळ, नाशिक – 422001

परिपत्रक क. नाविमं/शाखा योग्यता प्रमाणपत्र /2019 –2020 /518, दिनांक –07/06/2019

विषय – महाराष्ट्र राज्याबाहेरील तसेच भारताबाहेरील देशातून इ. 10वी /इ.11वी समकक्ष परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी इ.11 वी/इ.12वी प्रवेशासाठी मंडळाकडून घ्यावयाच्या योग्यताप्रमाणपत्रबाबत...

संदर्भ – महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ नियमावली 1977 नियम क.79 व 80.

नाशिक विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व मंडळ मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांना कळविण्यात येते की, वरील विषय व संदर्भानुसार महाराष्ट्र राज्याबाहेरील व भारताबाहेरील देशातून इ.10 वी /इ.11वी समकक्ष सार्वजनिक परीक्षा उत्तीर्ण केलेल्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्ष 2019 –2020 मध्ये इ.11वी/12 वीत आपल्या कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेतल्यानंतर त्यांचे योग्यता प्रमाणपत्रासाठीचे प्रस्ताव प्राचार्यांमार्फत विहीत नमुन्यातील छापील अर्जान्वये पाठविणे आवश्यक आहे. प्रस्तृत परिपत्रकात नमूद पात्रतेच्या व निर्धारीत केलेल्या मुदतीच्या अधिन राहून प्राचार्यानी अर्जासोबत आवश्यक कागदपत्रांची नियमित /विलंब किंवा मुदतीनंतर पाठविल्यास दंडात्मक शुल्कासह पुर्तता करणे आवश्यक आहे.

पात्रता –

1. मंडळ नियमावली विनियम क. 79(1) नुसार मंडळाने मान्य केलेल्या समकक्षता यादीनुसार राज्याबाहेरील कोणत्याही वैधानिक मंडळाची (10+2 आकृतीबंधानुसार ) माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा इंग्रजी या विषयासह किमान पाच विषयात उत्तीर्ण झालेले विद्यार्थी या विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील कनिष्ठ महाविद्यालय इ.11वी/12 वी प्रवेशास पात्र राहतील, तसेच विज्ञान शाखेत प्रवेश घेण्यासाठी विज्ञान विषयात 35 गुण असणे आवश्यक आहे. विज्ञान विषयात 35 पेक्षा कमी गुण असल्यास विज्ञान शाखेत प्रवेश देण्यात येऊ नये.

## अ) योग्यता प्रमाणपत्रासाठी छापील अर्जाचे शुल्क

| | | |
|---|---|---|
| 1 | महाराष्ट्र राज्याबाहेरील विद्यार्थ्यांसाठी | रू.100 |
| 2 | भारताबाहेरील विद्यार्थ्यांसाठी | रू.500 |

योग्यता प्रमाणपत्रासाठी विहित नमुन्यातील छापील अर्ज विभागीय मंडळ कार्यालयात रोख /चलनाद्वारे शुल्क जमा केल्यानंतर उपलब्ध होईल. सदर अर्जातील संपूर्ण रकाने परिपुर्ण भरून अर्जावर विद्यार्थ्यांचा फोटो डकविण्यात येवून सदरचा अर्ज संबधित प्राचार्याच्या स्वाक्षरीने प्रमाणित केलेले असावेत. प्रवेश घेतलेला वर्ग/शाखा, कनिष्ठ महाविद्यालयाचा सांकेतिक कमांक , पत्रव्यवहाराचा पत्ता , दुरध्वनी /मोबाईल कमांक इ. माहिती अचूक असावी. प्रमाणित (Attested) छायाप्रतीसह मुळ अर्ज पाठवावा. (अर्जाची छायाप्रत /जुना अर्ज स्विकारला जाणार नाही.)

## ब) योग्यता प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावयाचे आवश्यक कागदपत्रे

विद्यार्थ्यांनी मंडळाकडे परस्पर सादर केलेले प्रस्ताव स्विकारले जाणार नाहीत याबाबत संबंधित विद्यार्थ्यांना प्राचार्यांनी स्पष्ट सुचना आपल्या स्तरावरून दयाव्यात. आपल्या कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे योग्यता प्रमाणपत्र प्रस्ताव आपल्याच कनिष्ठ महाविद्यालयामार्फत सादर करणे आवश्यक आहे. योग्यताप्रमाणपत्रासाठी आवश्यक कागदपत्रांची पुर्तता करूनच योग्यता प्रमाणपत्र प्रस्ताव सादर करण्याची जबाबदारी कनिष्ठ महाविद्यालयांची राहील. सदर अर्ज पोस्टाने पाठवू नयेत. इ.11वी व इ.12 वीचे प्रस्ताव स्वतंत्र सादर करण्यात यावे. एकत्रित सादर केल्यास स्विकारले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

1. मागील सार्वजनिक परीक्षेची इ.10 वी गुणपत्रिकेची साक्षांकित छायाप्रत
2. मागील सार्वजनिक परीक्षेची इ. 10 वी उत्तीर्णता प्रमाणपत्राची साक्षांकित छायाप्रत
3. इ.11वीच्या गुणपत्रिकेची साक्षांकित छायाप्रत
4. शाळा सोडल्याच्या दाखल्याची साक्षांकित छायाप्रत
5. मुळ स्थलांतर प्रमाणपत्राची प्रत (Migration Certificate)
6. विहित नमुन्यातील हमीपत्राची (Deed Of Undertaking) मुळप्रत सादर करणे अनिवार्य आहे.
7. भारताबाहेरील विद्यार्थी असल्यास त्याने दिलेल्या परीक्षेच्या अभ्यासकमाची प्रत व Transcript सादर करावी.
8. इयत्ता 12 वीत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची इ.11वी परीक्षेच्या गुणपत्रिकेची साक्षांकित छायाप्रत पाठवावी.
9. इतर राज्यातील 12 वी परीक्षा अनुत्तीर्ण विद्यार्थ्यास शिक्षण उपसंचालक यांचे पुनःप्रवेशाबाबतचे परवानगी पत्र सादर करणे आवश्यक आहे.
10. काही राज्यातील विद्यार्थ्यांची उत्तीर्णता प्रमाणपत्र संबंधित परीक्षा/शिक्षण मंडळाकडून उशिराने प्राप्त होतात. अशावेळी तात्पुरते प्रमाणपत्र (Provisional Certificate) उपलब्ध करून घेणेबाबत विद्यार्थ्यांना सुचना दयाव्यात व त्याबाबत कनिष्ठ महविद्यालयाने कार्यवाही करावी.
11. बाहेरील राज्यातील विद्यार्थ्यानी इ.12 वी परीक्षेस प्रविष्ठ होण्यासाठी खाजगी विद्यार्थी म्हणुन बहिस्थ् योजनेतून (अर्ज क.17) अर्ज भरला असेल तर अशा विद्यार्थ्यांचे योग्यता प्रमाणपत्र प्रस्ताव त्वरीत भरण्यात यावेत.

## क) अर्ज मंडळाकडे सादर करावयाची मुदत (नियमित /विलंब /अतिविलंब शुल्कासह )

प्राचार्यांनी त्यांचेकडे जमा झालेले योग्यता प्रमाणपत्र प्रस्ताव खाली दर्शविण्यात आलेल्या तारखेस मंडळ कार्यालयात हस्तपोहोच सादर करणे.

| तपशिल | शुल्क | विद्यार्थ्यांनी कनिष्ठ महाविद्यालयास योग्यता प्रमााणपत्र सादर करावयाच्या तारखा | क. महाविद्यालयाने मंडळाकडे योग्यता प्रमाणपत्र अर्ज पाठविण्याची अंतिम दिनांक | जिल्हा |
|---|---|---|---|---|
| नियमित शूल्कासह | रू. 300/- महाराष्ट्र बाहेरील विद्यार्थ्यांसाठी<br>रू. 500/- भारताबाहेरील विद्यार्थ्यांसाठी | 16 सप्टेंबर 2019 सोमवार | मंगळवार दि. 17/09/2019 | नशिक |
| | | | बुधवार दि. 18/09/2019 | जळगाव |
| | | | गुरूवार दि. 19/09/2019 | नंदुरबार/धुळे |
| विलंब शुल्कासह | नियमित शुल्क + रू. 100/- विलंब शुल्क प्रति विद्यार्थी | 15 नोव्हेंबर 2019 शुक्रवार | शनिवार दि. 16/11/2019 | नाशिक |
| | | | सोमवार दि. 18/11/2019 | जळगाव धुळे, नंदुरबार |
| अतिविलंब शुल्क | नियमित शुल्क + विलंब शुल्क + अतिविलंब शुल्क रू.10/- प्रति दिवस प्रति विद्यार्थी प्रमाणे | दि. 16 नोव्हेंबर,2019 पासुन मंडळ कार्यालयास प्रस्ताव सादर करेपर्यंत प्रति विद्यार्थी प्रतिदिन रू.10/- अतिविलंब शुल्क आकारण्यात येईल. | | |

उपरोक्त शुल्क रोख/चलनाद्वारे प्राप्त झाल्यानंतरच त्यांचे प्रस्ताव स्विकारण्यात येतील.

अतिविलंब शुल्काबाबत विलंबाने योग्यता प्रमाणपत्र प्रस्ताव सादर केल्याबाबतचा प्राचार्यांनी स्वयंस्पष्ट खुलासा सादर केल्यानंतरच स्विकारण्यात येईल. अतिविलंबाचे प्रस्तावास मा. विभागीय अध्यक्ष यांनी खासबाब म्हणून मान्यता दिल्यानंतरच मान्य करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

## ड) उर्वरीत कागदपत्रे सादर करावयाची मुदत, विलंब व दंडात्मक शुल्काबाबत :-

| अ.क. | तपशिल | मुदत | विद्यार्थ्यांचा दंड | क.म.विद्यालयाचा दंड |
|---|---|---|---|---|
| 1 | कागदपत्रांची पुर्तता विनाविलंब | दि. 20 जानेवारी 2020 | --- | --- |
| 2 | कागदपत्रांची पुर्तता विलंब | दि. 21 जानेवारी 2020 ते दि. 31 ऑगस्ट 2020 | प्रति विद्यार्थी प्रतिदिनी रू.5/- | प्रति विद्यार्थी रू.100 /-विलंब दंड |

मुदतीतील कागदपत्रांची पुर्तता न करणाऱ्या विद्यार्थ्यांचा इ.12 वी परीक्षेचा निकाल राखीव ठेवण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी सदरची कागदपत्रे कोणत्याही परिस्थितीत पोस्टाने पाठवू नयेत ती समक्ष मंडळ कार्यालयास सादर करावीत.

## ई) महत्वाच्या सूचना

1. इ.11वीची परीक्षा कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर घेण्यात येत असल्याने ज्या विद्यार्थ्यांनी योग्यता प्रमाणपत्रासाठी आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केलेली नाही किंवा ज्या विद्यार्थ्यांना मंडळाकडून योग्यता प्रमाणपत्र देण्यात आलेले नाही, अशा विद्यार्थ्यांचा इ.11 वी वार्षिक परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात येवू नये.
2. जर सबंधित कनिष्ठ महाविद्यालयाने संबंधित विद्यार्थ्यांचा निकाल जाहीर केल्यास संबधित कनिष्ठ महाविदयालयाकडून प्रति विद्यार्थी रू.1000/- दंड वसूल करण्यात येईल व सबंधित कनिष्ठ महाविद्यालय प्रमूखांवर संस्थेमार्फत कारवाई करण्याबाबत संस्थेला कळविण्यात येईल याची नोंद घ्यावी.
3. अशा विद्यार्थ्यांस मंडळाच्या पुर्वपरवानगी शिवाय शाळा सोडल्याचा दाखला देवू नये. तसेच इ.12 वी च्या वर्गात प्रवेश देण्यात येवू नये
4. इ. 11वीच्या प्रवेशाच्या वेळेस योग्यता प्रमाणपत्र प्रस्ताव सादर न करता विद्यार्थ्याचा इ. 11 वीचा निकाल जाहीर केल्यानंतरही त्या विद्यार्थ्यांस इ. 12 वीत प्रवेश देवून तो विद्यार्थी इ. 12 वी परीक्षा देते वेळी ऑनलाईन आवेदनपत्र भरतांना योग्यता प्रमाणपत्र रकान्यात बनावट कमांक टाकण्यात येवू नये, तसे केल्यास संबंधित कनिष्ठ महाविद्यालयास जबाबदार धरण्यात येईल व मंडळ नियमानुसार दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

उपरोक्त योग्यता प्रमाणपत्र प्रस्ताव आवश्यक कागदपत्रांसह मंडळाकडे सादर करावयाची विहित मुदत, नियमित /विलंब/दंडात्मक शुल्क, योग्यता प्रमाणपत्र प्रस्तावातील आवश्यक उर्वरीत कागदपत्रे मंडळाकडे सादर करण्याची मुदत याबाबत दिलेल्या सर्व सुचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. सदर परिपत्रकाची माहिती सर्व तपशिलासह विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणावी. सदर परिपत्रकातील सुचना क. 1 ते 11 नुसार आवश्यक त्या कागदपत्रांची व शुल्कांची पुर्तता करूनच योग्यता प्रमाणपत्र प्रस्ताव कनिष्ठ महाविद्यालयाचा सांकेतिक कमांक व शाखा निहाय माहिती विहित मुदतीत मंडळाकडे सादर करावी, सांकेतिक कमांक प्राप्त नसल्यास योग्यता प्रमाणपत्र प्रस्ताव स्विकारले जाणार नाहीत, तसेच अपुर्ण प्रस्ताव स्विकारले जाणार नाहीत याचीही नोंद घ्यावी.

(नितीन उपासनी)
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नाशिक विभागीय मंडळ, नाशिक 422001

प्रति,
1) नाशिक विभागीय मंडळ कार्यकक्षेतील सर्व मंडळ मान्यता प्राप्त कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रमुख
2) विभागीय शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग, नाशिक
3) शिक्षणधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद नाशिक/धुळे/जळगाव/नंदुरबार
4) लेखा शाखा/उच्च माध्यमिक परीक्षा विभाग, नाशिक विभागीय, मंडळ
5) राज्य मंडळ पुणे